

शनिदेवाची आरती

जय जय श्रीशनिदेवा। पद्मकर शिरीं ठेवा॥

आरती ओंवाळीतों। मनोभावें करुनि सेवा ॥ धृ.॥

सूर्यसुता शनिमूर्ति॥ तुझी अगाध कीर्ती॥

एकमुखें काय वर्णू। शेषा न चले स्पूर्ती॥ जय.॥ १ ॥

नवग्रहांमाजीं श्रेष्ट। पराक्रम थोर तुझा॥

ज्यांवरी तूं कृपा करिसी। होय रंकाचा राजा॥ जय.॥ २ ॥

विक्रमासारिखा हो। शककर्ता पुण्यराशी॥

गर्व धरितां शिक्षा केली। बहु छळियेलें त्यासी॥ जय.॥ ३ ॥

शंकराच्या वरदानें। गर्व रावणें केला॥

साडेसाती येतां त्यासी समूळ नाशासी नेला॥ जय.॥ ४ ॥

प्रत्यक्ष गुरुनाथा॥ चमत्कार दावियेला॥

नेउनी शूळापाशीं। पुन्हां सन्मान केला॥ जय.॥ ५ ॥

ऐसे गुण किती गाऊं। धणी न पुरे गातां॥

कृपा करी दीनावरी। महाराजा समर्था॥ जय.॥ ६ ॥

दोन्ही कर जोडुनीयां। रुक्मा लीन सदा पार्थी॥

प्रसाद हाचि मागे। उदयकाळ सौख्य दावीं॥ जय.॥ ७ ।

*शनिमहात्म्याचे सारांश ह्या आरतीमध्ये आहे .शनिमहात्म्यामध्ये उपदेश केल्यापमाणे ह्या आरतीमध्येही हेच सांगितले आहे की* ***गर्व करू नये.*** *गुरुदेवांला गर्व झाला* ***त्यांचा गर्व हरण शनिदेवाने केला.*** *ज्यांना ज्यांना गर्व झाला त्यांना त्यांना शनिदेवाने संकटात टाकून त्यांचा गर्व दूर केला. आपण सर्वांनी शनिदेवांची भक्ति करावी आणि त्यांला* ***शरण*** *जावे. असे केल्याने शनिदेव प्रसन्न होऊन आपल्या सर्वांला शुभार्शिवाद देतील.*

***तुच करता आणि करवीता शरण तुला भगवंता***

_/_ आनंद गुप्ते

**Please send your comments / suggestions by email: anandgupte@yahoo.com**